DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते



# फौजदारी चौकशी अर्ज क्र.२७१/२०२३

सौ. सीमा संदीप काळण
विरुध्द
श्री. संदीप गोविंद काळण आणि इतर

## निशाणी क्र.१४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी कलम २३ अन्वये सामनेवालांविरुध्द स्वतःच्या मुलाला भेटण्यासाठी अंतरिमतित्या आदेश होण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, सामनेवाला क्र.१ व अर्जदार यांचा मुलगा नामे भार्गव यास सामनेवाला हे अर्जदार यांना भेटून देत नाहीत. भार्गव हा सामनेवाला यांच्यासोबत राहत आहे. अर्जदार या भार्गव यास भेटण्यासाठी पुर्वी नेरळ येथील त्याच्या शाळेत जात होत्या. परंतु त्या शाळेतुन भार्गव याचे नाव कमी करुन त्यास दुसऱ्या शाळेत घातलेले आहे. तेव्हापासुन अर्जदार यांना सामनेवाला यांनी मुलगा भार्गव यास भेटून दिलेले नाही. अर्जदार यांची अशी विनंती आहे की, त्यांचा मुलगा भार्गव यास महिन्याच्या कोणत्याही रविवारी भेटण्याची परवानगी मिळावी.

०३. सामनेवाला क्र.१ यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. सामनेवाला क्र.१ यांचे असे कथन आहे की, सदरचा अर्ज हा खोटया व खोडसाळ स्वरुपाचा आहे. अर्जदार हिने सामनेवाला यांचे नांदते घर स्वेच्छेने सोडून दिले आहे व त्याचवेळी मुलगा भार्गव यास सामनेवाला यांच्याकडे सोडलेले आहे. अर्जदार हिने मागील १० वर्षात मुलगा भार्गव याची कोणत्याही प्रकारे काळजी घेतली नाही. सबब, सामनेवाला यांच्याकडे

अर्जदार हिने मुलाला भेटण्याची मागणी करणे हे योग्य व न्यायोचित नाही. अर्जदार हिने मुलगा नामे भार्गव यास भेटण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. केवळ न्यायालयाची सहानुभुती मिळविण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने दाखल केला आहे. सबब, सामनेवाला यांची अशी विनंती आहे की, योग्य ते आदेश व्हावेत.

०४. अर्जदार व सामनेवाला यांच्या कथनांचा विचार करता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, सामनेवाला क्र.१ व अर्जदार यांचा मुलगा नामे भार्गव हा सामनेवाला क्र.१ यांच्या ताब्यात आहे. आई या नात्याने अर्जदार यांना त्यांच्या मुलाला भेटण्याचा अधिकार आहे. अर्जदार यांची गरज लक्षात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | सामनेवाला क्र.१ यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत अर्जदार व सामनेवाला क्र.१ चा मुलगा चि. भार्गव यास नेरळ पोलीस स्टेशनच्या आवारात घेऊन यावे. |
| २. | सामनेवाला क्र.१ यास असे निर्देशित करणेत येते की, त्यांनी न्यायालयाने वर नमुद केल्याप्रमाणे ठरवुन दिलेल्या दिवशी, वेळी व ठिकाणी मुलगा चि. भार्गव यास अर्जदार यांची भेट करुन द्यावी. |

ASAVARI SURESH WADKAR
Digitally signed by ASAVARI SURESH WADKAR
Date: 2025.05.31 17:25:45 +0530

दिनांक २८/०५/२०२५

(ए. एस. वाडकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कर्जत,
जि. रायगड